# कृषि वनस्पतीशास्त्र विभाग
## कृषि महाविद्यालय, परभणी
## वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ,
## परभणी ४३१ ४०२ (म.रा.) भारत


जा.क्र.जिबी/१३९९/२०२४
दिनांक: १०/०९/२०२४

आज दि. ०९/१०/२०२४ रोजी ५८ व्या भारतीय कृषि अभियंता अधिवेशन व आंतरराष्ट्रिय परीषद दि. १२ ते १४ नोव्हेंबर २०२४ दरम्यान होणाऱ्या कार्यक्रमासाठी भोजन व्यवस्था पुरविणाऱ्या निविदा धारकांची बैठक मा. प्रा. (डॉ.) इंद्र मणी, कुलगुरु, वनामकृवि, परभणी यांच्या अध्यक्षतेखाली बैठक घेण्यात आली.

सदर बैठकीस खालील प्रमाणे सदस्य उपस्थित होते.

| अ.क्र. | अधिकाऱ्याचे नाव | पदनाम |
|---|---|---|
| १ | मा. प्रा. (डॉ.) इंद्र मणी | मा. कुलगुरु, वनामकृवि, परभणी |
| २ | मा. डॉ. उदय खोडके | संचालक शिक्षण तथा अधिष्ठाता (कृषि) |
| ३ | मा. प्रविण निर्मळ | नियंत्रक |
| ४ | डॉ. हिराकांत काळपांडे | अध्यक्ष, भोजन समिती तथा विभाग प्रमुख, कृषि वनस्पतीशास्त्र विभाग |
| ५ | डॉ. महेश देशमुख | उपाध्यक्ष, भोजन समिती तथा सहयोगी प्राध्यापक, मृद विज्ञान विभाग |
| ६ | डॉ. डि. डि. टेकाळे | सदस्य भोजन समिती तथा प्राध्यापक, |
| ७ | डॉ. जयकुमार देशमुख | सदस्य भोजन समिती तथा सहाय्यक प्राध्यापक कृषि वनस्पतीशास्त्र विभाग |
| ८ | श्री. बी.एम. भालेराव | व्यवस्थापक, सुविधा केटर्स, परभणी |
| ९ | मोहंती पवार | व्यवस्थापक, कोकोनट लगून, परभणी |
| १० | श्री. शुभम काळे | ओनर, जैन भोजनालय ॲन्ड केटर्स, परभणी |
| ११ | श्री. शेषराव काळे | ओनर, काळे केटर्स, अकोला |
| १२ | श्री. अक्षय पुंडकर | व्यवस्थापक, त्रिशा केटर्स ॲन्ड इव्हेंट मॅनेजमेंट, अकोला |

सभेच्या सुरुवातीला डॉ. महेश देशमुख, उपाध्यक्ष भोजन समिती मा. कुलगुरु व इतर उपस्थित मान्यवरांचे शब्द सुमनांनी स्वागत केले व भोजन निविदासंबधीत सर्व अटी व शर्ती याबददल सविस्तर माहिती निविदा पुरवठा धारकांना देण्यात आली. त्यानंतर उपस्थित निविदा पुरवठा धारकांनी आपली ओळख मा. कुलगुरु यांना करुन दिली. तदनंतर मा. कुलगुरु यांनी सर्व निविदा पुरवठा धारकांना सुचित केले की

त्या अनुषंगाने मा. कुलगुरु यांनी खालील प्रमाणे सुचना केल्या.

- सदर आंतरराष्ट्रीय परिषदेचे आयोजन या विद्यापीठात सर्वप्रथम होत असुन या कार्यक्रमात ५०० पेक्षा महाराष्ट्र व इतर राज्यातील शास्त्रज्ञ व इतर मान्यवर सहभागी होणार आहेत. त्यामुळे सदरील कार्यक्रम हा विद्यापीठ, महाराष्ट्र व मराठवाडयाची शान वाढवणारा असणार आहे. त्यामुळे सर्वांनी मनापासुन कार्य करावे.
- सदरील कार्यक्रमाचे देयक निविदा पुरवठा धारकास कार्यक्रमानंतर तात्काळ करण्यात येणार असल्यामुळे भोजन पुरवठयाकरीता रास्त भाव देण्यात यावा.

- पुरविण्यात येणारे भोजन हे कमी तेल व कमी मसाल्यात तयार करावे. तसेच भोजन स्वादिष्ट व रुचकर असावे.
- पुरविण्यात येणाऱ्या भोजनातील सलाद ताजे असावे.
- भोजनाच्या ठिकाणी अतिथी, सहभागी शास्त्रज्ञ व आयोजक यांची भोजनाची व्यवस्था एकाच दालनात स्वतंत्रपणे करण्यात यावी.
- भोजन पुरविणारे वेटर्स यांची संख्या मुबलक असावी तसेच ते मृदभाषी व स्वच्छ कपडे परीधान केलेले व त्यांचा पोशाख हा पुरषांना कुर्ता पायजामा व महिला असल्यास चुडीदार, साडी किंवा महाराष्ट्र संस्कृति दर्शविणारा असावा.
- निविदा पुरवठा धारकांना राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय परिषदेत भोजन पुरविल्याचा अनुभव असल्यास त्याचे अदायगी देयक अथवा पुरवठा आदेश याची प्रत सोबत जोडावी.
- भोजनाच्या ठिकाणी व भोजन बनविण्याच्या ठिकाणी स्वच्छता व निटनिटकेपणा असावा.
- सदर परिषदेस उपस्थित राहणारे वरीष्ठ प्राध्यापक तथा शास्त्रज्ञ हे आपसातले सत्र संपवुन जेवणाच्या ठिकाणी आल्या नंतर त्यांना ताजे व दर्जेदार अन्न पुरविण्यात यावे.
- भोजनामध्ये मांसाहाराचा समावेश राहणार नाही.
- भोजनाची प्रत खराब असल्यास देयक रोखुन धरण्यात येईल.
- सदरील भोजनाच्या ठिकाणी विद्यापीठ प्रशासनातर्फे पुरेशी सुरक्षा पुरविण्यात येईल.

**अध्यक्ष**
**भोजन समिती तथा विभाग प्रमुख,**
**कृषि वनस्पतीशास्त्र विभाग,**
**वनामकृवि, परभणी**

**प्रतिलिपीः** १. मा.संचालक शिक्षण तथा अधिष्ठाता (कृषि), वनामकृवि, परभणी यांना माहितीस्तव सादर.
२. मा. कुलगुरु, वनामकृवि, परभणी यांचे स्विय सहाय्यक यांना माहितीस्तव सादर.
३. डॉ. एच. डब्लु. आवारी, सदस्य सचिव, सुकानु समिती, वनामकृवि, परभणी यांना माहितीस्तव सादर.